# सूचना

**कामाचे नाव** – आर्थिक वर्ष सन २०२६-२७ (दि.०१-०५-२०२६ ते दि.३१-०३-२०२७) या वर्षामधील आयकर विषयक कामे करुन देण्यासाठी दरपत्रक देण्याबाबत...

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, पु.ल.देशपांडे कला अकादमी संकुल, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई-२५ या कार्यालयाकडून आर्थिक वर्ष २०२६-२७ (दि.०१-०५-२०२६ ते दि.३१-०३-२०२७) या कालावधीमधील आयकर विषयक कामे शासनाच्या विहीत नमुन्यानुसार व कालावधीमध्ये करुन देण्यासाठी मुंबई येथील स्थानिक आयकर विषयक कामे करणा-या संस्थांकडून सीलबंद पाकिटातून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. खालील नमूद केलेल्या करावयाच्या कामाचे दर (सर्व करासह) **दि.१५-०४-२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत** नियंत्रक कार्यालय, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, बालभारती, पु.ल.देशपांडे कला अकादमी, रविंद्र नाट्य मंदिराजवळ, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई-२५ या पत्त्यावर समक्ष प्राप्त होणे बंधनकारक आहे. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. दरपत्रक मंजूर अथवा नाकारण्याचा अधिकार नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,मुंबई-२५ यांचा राहिल.

**करावयाच्या कामाची माहिती खालीलप्रमाणे –**

१) 24Q TDS Return Preparation and filling
२) 26Q TDS Return Preparation and filling
३) Revised Return Preparation and filling
४) Issue of Form 16 & 16A certificates
५) करविषयक सल्ला देणे.
६) तिमाही टीडीएसची माहिती शासनास सादर केल्यानंतर प्राप्त झालेल्या प्रोव्हिजनल रिसिप्टनुसार देयकाची अदायगी धनादेशाद्वारे करण्यात येईल.
७) अधिकारी/कर्मचारी यांच्या दरमहाच्या वेतनातून कापण्यात येणाऱ्या आयकराचे U/s 192B अन्वये तिमाही रिटर्न व वार्षिक रिटर्न Form No.24 काळजीपूर्वक तपासून दाखल करणे. त्याचबरोबर कर्मचाऱ्यांचे वार्षिक Form No.16 तयार करुन पाठविणे.
८) कंत्राटदार, हॉस्पिटल व इतर संस्था ज्यांच्या देयकांतून U/s 194C, U/s 194J व U/s 194I अंतर्गत आयकर कपात केलेला असतो त्याचे तिमाही रिटर्न दाखल करणे तसेच वार्षिक रिटर्न Form No.26 दाखल करणे. तसेच तिमाही रिटर्न दाखल करुन संस्थांना व हॉस्पिटल ला तिमाही द्यावयाचे Form No.16A डाउनलोड करुन पाठविणे.
९) दरमहा CGST-TDS व SGST-TDS चे रिटर्न काळजीपूर्वक दाखल करणे. तसेच रिटर्न दाखल केल्यानंतर ज्यांचा GST-TDS कपात केलेला आहे अशा संस्थांना प्रमाणपत्र देणे.
१०) उपरोक्त मध्ये कोणत्याही प्रकारची आयकर विभागाकडून नोटीस (Notice) आल्यास त्याची पूर्तता करण्याची जबाबदारी सदर आयकर सल्लागाराची असेल व यासाठी त्यांना कोणताही स्वतंत्र मोबदला दिला जाणार नाही.

..२..

११) आयकर व जीएसटी चे कामकाज बघण्यासाठी व त्याबाबत योग्य ती दक्षता घेण्याच्या दृष्टीने नियंत्रक कार्यालय, प्रभादेवी येथे प्रत्येक आठवड्याच्या मंगळवारी नेमणूक करावयाच्या आयकर सल्लागारामार्फत अनुभवी व जाणकार व्यक्ती उपस्थित असणे गरजेचे आहे. जेणेकरुन आयकराच्या कपातीमध्ये तफावत न राहता योग्य व वेळेत आयकर व जीएसटी-टीडीएस शासन जमा करणे सोईचे होईल.

१२) Medical Reimbursement पोटी Section 17 (2) Rule 3A अन्वये अधिकारी/ कर्मचारी यांनी आयकरात सूट मिळण्यासाठी सादर केलेली वैद्यकीय प्रमाणपत्रे योग्य आहेत की नाही ते तपासणे.

आपल्या संस्थेच्या सक्षम प्रतिनिधीमार्फत या कार्यालयातील आयकर संबंधित करावयाच्या कामाची पडताळणी करुन आपल्या संस्थेचे सर्व करासहीतचे सीलबंद दरपत्रक या कार्यालयास देण्यात यावे.

(हेमंत व.बाबर)
प्र.नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई-२५

दरपत्रक सूचना क्रमांक :-न/लेखा/ 36
दिनांक :- 08 APR 2026